आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव कोट्यामधे आणखी उपआरक्षण देणं चुकीचं नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- देशभरातल्या १५ विमानतळांवर डिजियात्रा हा उपक्रम राबवण्यात येणार

- आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक २०२४ लोकसभेत सादर

- वायनाड मधल्या दरड दुर्घटनेतल्या बळींची संख्या अडीचशेच्या वर/ बचावकार्य अद्याप सुरु

- पॅरिस ऑलिंपिकमधे भारताचे सर्व बॅडमिंटनपटू आज मैदानात

**आणि**

- ज्येष्ठ क्रिकेटपटू अंशुमन गायकवाड यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ

**<><><><><>**

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव कोट्यामधे आणखी उपआरक्षण द्यायला हरकत नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली ७ न्यायाधीशांच्या पीठानं आज हा निर्णय दिला. अनुसूचित जाती आणि जमातींमधेही आर्थिक आणि सामाजिक स्तरांमधे प्रचंड विविधता असून त्यामुळे सर्व प्रकारच्या मागास वर्गांना एकाच गटात आरक्षण

यांना पत्र लिहिलं असल्याचं त्यांनी संसद भवनाच्या आवारात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. सरकारनं ही घोषणा केल्यानंतर खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत मदत आणि पुनर्वसनाच्या कामासाठी एक कोटी रुपये देणार असल्याचंही थरूर यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

केरळमध्ये वायनाड इथं भूस्खलनामध्ये मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २५० वर पोहोचली आहे. या ठिकाणी मदत कार्य सुरु असून, भारतीय लष्करानं काल ढिगाऱ्याखाली अडकलेल्या १७९ जणांची सुटका केली, तर ४ मृतदेह बाहेर काढले. अट्टमला, मुंडक्काई आणि चूरलमला या भागातलं मदत कार्य युद्ध पातळीवर सुरु आहे. प्रत्येक शोध पथकामध्ये श्वान पथकाचाही समावेश आहे.

चूरलमला इथल्या ओढ्यावरच्या पुलाचं काम आज दुपारपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. भूस्खलन झालेल्या भागात मदत कार्यासाठी अवजड यंत्रसामुग्री आणि माणसांची वाहतूक करण्यासाठी तो उपयोगी ठरेल.

वायनाड इथल्या भूस्खलनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय हवाई दलानं एनडीआरएफ आणि इतर संस्थांच्या समन्वयानं बचाव आणि मदत कार्य सुरू केलं असून, वैद्यकीय मदत आणि इतर आवश्यक उपकरणांसह आतापर्यंत ५३ मेट्रिक टन अत्यावश्यक वस्तूंची वाहतूक केली आहे. हवाई दलाच्या विमानांनी तसंच प्रगत हलक्या वजनाच्या ध्रुव हेलिकॉप्टरच्या मदतीनं आपत्तीग्रस्त भागातल्या अनेक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

